२ पानी १५० पुस्तके) ६-०१ (८२) बांधकाम नियंत्रण

# पुणे महानगरपालिका

( यापुढील पत्रव्यवहारात खालील क्रमांक व दिनांक यांचा उल्लेख करावा. )

( जागेच्या वा इमारतीच्या कायदेशीर मालकी हक्कांचे संदर्भ लक्षात न घेता अर्जदारास हे संमतीपत्र देण्यात येत आहे. ) 1604

## बांधकाम चालू करण्याकरिता दाखला
## (कमेन्समेन्ट सर्टिफिकेट)

सदरचा बांधकाम चालू करण्याचा दाखला आणि बांधकामाचे संमतीपत्र महाराष्ट्र नगर रचना अधिनियम, सन १९६६ ची कलमे ४४/४५/५८/६९ यांतील आणि मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, सन १९४९ ची कलमे (सेक्शन्स) २५३ व २५४ यांतील तरतुदींप्रमाणे खालील अटींवर देण्यात येत आहे.

झोपडपट्टी पुनर्वसन
पुणे महानगर पालिका
BCP / 463
८/१०/०३

बांधकाम नियंत्रण कार्यालय
पुणे महानगरपालिका.
शिवाजीनगर, पुणे ५.
क्रमांक : १६०४ ०३
दिनांक : ७ / ११ / १९९

श्री./श्रीमती. मे. गृहनिर्माण डेव्हलपर्स जागेदार श्रीमती [illegible] जोशी (हिरेन) द्वारा लृ. स. श्री. नरेंद्र पोतदार

राहणार पुणे, पेठ नारायण घरांक, सर्व्हे नं. ५७ यांस –

महाराष्ट्र नगररचना अधिनियम, सन १९६६ ची कलमे ४४ / ४५ / ५८ / ६९ व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, सन १९४९ ची कलमे २५३ / २५४ प्रमाणे पुणे महानगरपालिकेच्या सीमेतील

पेठ मार्केट यार्ड घरांक T P S No 1 राजेंद्र नगर

फायनल प्लॉट क्र. १००४ प्लॉट क्र. — मधील बांधकाम करण्यासाठी महानगरपालिकेला तुम्ही नोटीस दिली, ती दि. ८ / १ / ०३ या दिवशी पोहोचली. त्यावरून काम करण्यास खाली लिहिलेल्या सूचना व सर्व अटींवर तुम्हास संमतीपत्र देण्यात येत आहे.

१. संबंधी सुधारित विकास योजना आराखडा महाराष्ट्र सरकारने दि. ५ । १ । १९८७ या दिवशी मान्य केला आहे. त्यास अनुसरून नवीन कामास काही उपसर्ग पोहोचत असल्यास अथवा हानी होत असल्यास त्याप्रीत्यर्थ कोणत्याही प्रकारची भरपाई मागणार नाही व ती देण्याची जबाबदारी महानगरपालिकेवर नाही.

२. सोबतच्या नवीन / दुरुस्त नकाशात दाखविल्याप्रमाणे काम केले पाहिजे.

३. जोत्यापर्यंत काम आल्यावर सेट-बॅक, मार्जिनल ओपन स्पेसिस इ. बाबी बांधकाम नियंत्रण कार्यालयाकडून तपासून घ्याव्यात. त्याशिवाय जोत्यावरील काम सुरू करू नये.

४. मा. सहायक अभियंता (भूमिप्रापण) यांच्या कार्यालयामार्फत रस्त्याची प्रमाणरेषा जागेवर आखून घेणार व मगच बांधकाम सुरू करणार या अटीवरच हे संमतीपत्र देण्यात येत आहे.

५. सोबतच्या नकाशावर मागे लिहिलेल्या / चिकटविलेल्या अटींवर हे संमतीपत्र देण्यात येत आहे.

६. ज्या प्लॉट्सवर नवीन इमारत बांधण्यात आली आहे त्या इमारतीचे भोगवटापत्र मागण्यापूर्वी प्रत्येक मालकाने इमारतीसमोर कांपाउंड वॉलच्या आत व बाहेर किमान चार झाडे लावून ती व्यवस्थित वाढविण्याच्या दृष्टीने योग्य ती व्यवस्था व खबरदारी घ्यावी. त्याशिवाय ऑक्युपन्सी सर्टिफिकेट (भोगवटापत्र) मिळणार नाही. रस्त्यावरील झाडांना जरूर ते संरक्षण कुंपण अर्जदाराने करावयाचे आहे.

७. इमारतीचे भोगवटापत्र देताना रस्त्यावरील व आतील बाजूस टाकण्यात आलेले इमारतीचे अविशिष्ट सामान व राडारोडा उचलून जागा साफ केल्याशिवाय अर्जाचा विचार केला जाणार नाही. राडारोडा कोठे टाकावा याबाबत घरपाडी विभागामार्फत मार्गदर्शन केले जाईल.

८. काम सुरू करण्यापूर्वी मा. नगर उपअभियंता (जलोत्सारण) व (पाणीपुरवठा) यांच्याकडे नकाशे दाखल करून संबंधित कामाकरिता पूर्वमान्यता घेतल्याखेरीज जागेवर कोणतेही काम सुरू करू नये.

९. नवीन बांधकाम सुरू करताना संबंधित जागेमध्ये झाडे असल्यास ती ट्री अँथॉरिटीची पूर्वपरवानगी घेतल्याशिवाय तोडू नयेत; अन्यथा कायदेशीर कारवाई करण्यात येते याची नोंद घ्यावी.

१०. बांधकाम नियंत्रण खात्याने जरी सेप्टीक टॅन्कसाठी परवानगी दिली असली तरी ड्रेनेजविषयी मा. नगर उपअभियंता (जलोत्सारण विभाग) यांच्याकडे नकाशे दाखल करून त्यांची मंजुरी घेतल्याखेरीज सेप्टीक टॅन्क अगर ड्रेनेजसंबंधी बांधकाम सुरू करू नये व ऑक्युपन्सी सर्टिफिकेट मागण्यापूर्वी ड्रेनेज कामाचा पूर्णत्वाचा दाखला हजर करण्यात यावा.

११. जे बांधकाम नकाशात पाडणार म्हणून दर्शविले आहे, ते प्रथम पाडून मग नवीन कामास सुरवात करणार.

१२. मालकी हक्काबाबत व इतर कोणत्याही हक्काबाबत व हद्दीबाबत वाद निर्माण झाल्यास त्यास अर्जदार जबाबदार राहणार.

१३. कामगारांच्या सोयीसाठी जागेवर किमान एक संडास व एक मुतारी तात्पुरत्या स्वरूपाची बांधली पाहिजे. जुनें संडास व मोरी असल्यास याप्रमाणे संडास, मुतारी बांधण्याची गरज नाही.

१४. भोगवटापत्र मागण्यापूर्वी मनपाचे कर भरल्याचा दाखला सादर करणार.

१५) मान्य नकाशाच्या मागोमागे चिटकविलेल्या सर्व अटी बंधनकारक राहतील

वरील संमतीपत्राप्रमाणे काम करताना नगररचना अधिनियम अगर त्यास अनुसरून केलेले नियम व पोटनियम यांचा भंग होता कामा नये.
वरील संमतीपत्रासंबंधी काही शंका येत असेल तर कामास आरंभ करण्यापूर्वी महानगरपालिकेकडे तसे कळवून स्पष्टीकरण करून घ्यावे.

S.P. Chaudhari
7-11-2003
इमारत निरीक्षक,
बांधकाम नियंत्रण कार्यालय.

सक्षम प्राधिकारी (ग.ब.नि.)
व नगर अभियंता
पुणे महानगरपालिका

7/11/03
सहाय्यक अभियंता (बांधकाम नियंत्रण),
पुणे महानगरपालिका.

(मागे पाहा.